तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, १० सप्टेंबर २०२५

आतील पानावर
पान २–'या' अभिनेत्रीचा सिद्धार्थ होता क्रश
पान ३ – लग्न ही सगळ्यात अवघड गोष्ट
पान ४ – 'अशी' होती प्रिया मराठे-शंतनूची...
पान ५ – विजय सेतुपतीचा आणखी एक धमाका
पान ६ – बाळासाहेब ठाकरेंच्या नातवाची बॉलिवूडमध्ये...



# शाहिदच्या आगामी चित्रपटाचे शूटिंग पूर्ण



बॉलिवूड अभिनेता शाहिद कपूरच्या चाहत्यांसाठी आता एक आनंदाची बातमी आहे. शाहिदने चित्रपट दिग्दर्शक विशाल भारद्वाजसोबतच्या त्याच्या आगामी चित्रपटाचे शूटिंग पूर्ण केले आहे. या चित्रपटाचे शीर्षक अद्याप जाहीर झालेले नाही. परंतु शाहिदने एका रॅप अप पोस्टसह चित्रपटातील स्टारकास्टची घोषणा केली आहे. यासोबतच शाहिदने असेही सांगितले आहे की, त्याच्या चित्रपटाचे शीर्षक लवकरच जाहीर केले जाईल. शाहिदने इंस्टाग्रामवर भारद्वाजसोबतचा स्वतःचा एक ब्लॅक अँड व्हाइट फोटो शेअर केला आहे. चित्रपटाच्या सेटवर काढलेल्या या फोटोमध्ये भारद्वाज शाहिदला काहीतरी समजावून सांगताना दिसत आहे. समोर ठेवलेला कॅमेरा देखील चित्रात दिसत आहे. या फोटोसोबतच, अभिनेत्याने एक पोस्ट लिहिली आहे. ज्यामध्ये त्याने त्याच्या सहकलाकारांचे कौतुक केले आहे. शाहिदच्या इंस्टाग्राम पोस्टवरून भारद्वाजसोबतच्या त्याच्या चित्रपटातील स्टारकास्टची यादी उघड झाली आहे. या चित्रपटात शहिद तृप्ती डिमरीसोबत रोमान्स करताना दिसणार आहे. दिशा पटानी, नाना पाटेकर, फरीदा जलाल आणि अविनाश तिवारी हे देखील या चित्रपटाचा भाग असतील. पोस्टमध्ये शाहिदने पुढे लिहिले आहे- 'तृप्ती डिमरीसोबत काम करताना मला खूप मजा आली. कृपया या चित्रपटात तिच्या अभिनयाकडे लक्ष द्या. नाना पाटेकर यांनी माझ्यासाठी सर्वात गुंतागुंतीचे दृश्ये देखील सोपी केली. फरीदा जलाल जी, तुमच्या सभ्यतेबद्दल धन्यवाद. अविनाश तिवारी, तुमच्या प्लेलिस्टबद्दल धन्यवाद, ते खूप गोड होते. मी यापेक्षा जास्त काही सांगू शकत नाही.' शाहिदने शेवटी सांगितले की चित्रपटात दिशा पटानीसोबत त्याचे दोन गाणे असतील. शाहिद कपूर आणि तृप्ती दिमरी पहिल्यांदाच पडद्यावर एकत्र रोमान्स करताना दिसणार आहेत. या चित्रपटाचे शीर्षक 'रोमियो' असू शकते आणि तो ५ डिसेंबर २०२५ रोजी थिएटरमध्ये येऊ शकतो.


# 'या' अभिनेत्रीचा सिद्धार्थ होता क्रश

अलिकडेच, 'परम सुंदरी' चित्रपटातील कलाकार सिद्धार्थ मल्होत्रा, जान्हवी कपूर, संजय कपूर, मनजोत सिंग आणि इनायत वर्मा कपिल शर्माच्या 'द ग्रेट इंडियन कपिल' शोमध्ये दिसले. शोदरम्यान अभिनेता संजय कपूरने खुलासा केला की, सिद्धार्थ माझ्या मुलीचा क्रश होता. संजय कपूर म्हणाला, त्यावेळी शनायाचा तेरावा वाढदिवस होता. त्यावेळी सिद्धार्थ 'स्टुडंट ऑफ द इयर' चित्रपट करत होता आणि शनायाला तो आवडला होता. करणने रात्री १२ वाजता तिला वाढदिवसाची भेट पाठवली होती.

सिद्धार्थ म्हणाला, मला करणचा मेसेज आला की आज कोणाचा तरी वाढदिवस आहे. मला वाटलं की आज त्याचा (संजयचा) वाढदिवस आहे, पण तो शनायाचा वाढदिवस होता. म्हणून मी तिच्या घरी गेलेलो. संजय पुढे म्हणाला, करणने सिद्धार्थ आणि वरुण दोघांनाही आमंत्रित केले होते, पण वरुण म्हणाला, 'मी का जाऊ? ती सिद्धार्थची चाहती आहे. दरम्यान, शोमध्ये इनायत वर्माने सांगितले की तिने रणबीर कपूर, अभिषेक बच्चन आणि आता जान्हवी कपूर सिद्धार्थ मल्होत्रा यांच्याबरोबर काम केले आहे. जेव्हा कपिल शर्माने विचारले की, तिचे शिक्षक तिला विचारतात का आम्ही सेटवर येऊ का? तेव्हा इनायत म्हणाली, हो, ते विचारतात. 'मला त्यांच्याबरोबर एक फोटो काढायचा आहे. प्लिज इनायत असे म्हणतात. माझे वर्गमित्र बहुतेकदा जान्हवी आणि सिद्धार्थ प्रत्यक्षात कसे आहेत असे विचारतात. 'परम सुंदरी' हा चित्रपट तुषार जलोटा यांनी दिग्दर्शित केला आहे. हा चित्रपट २९ ऑगस्ट रोजी प्रदर्शित झाला. सोशल मीडियावर 'परम सुंदरी'ला संमिश्र प्रतिसाद मिळत असला तरी बॉक्स ऑफिसवर त्याची जबरदस्त कमाई सुरू आहे. हा चित्रपट सिद्धार्थच्या करिअरमधील सर्वाधिक ओपनिंग करणारा पाचवा चित्रपट ठरला आहे.



पहिल्या दोन दिवसांची कमाई जवळपास १६.७५ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली होती. क्रिती सनॉनच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचे झाले तर, ती शेवटची ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झालेल्या 'दो पत्ती' या चित्रपटात दिसली होती. या चित्रपटात तिची दुहेरी भूमिका होती. यात काजोलही भूमिका साकारताना दिसली. शनायाचा सिध्दार्थ क्रश होता, आता ते एकत्र सिनेमा करत आहेत. त्यामुळे चाहते खूश आहेत.




# मुंबईत कधी आपलेपणा वाटलाच नाही

ज्येष्ठ अभिनेते मनोज वाजपेयी आगामी 'इन्स्पेक्टर झेंडे' या सिनेमात दिसणार आहे. हा सिनेमा नुकताच ओटीटीवर आला आहे. कुख्यात सीरिअल किलर चार्ल्स शोभराज जेलमधून पळ काढतो. त्यानंतर इन्स्पेक्टर झेंडे मुंबईभर त्याला शोधण्याची मोहीम हाती घेतात. या सस्पेन्स थ्रिलरवर सिनेमा आधारित असणार आहे. अभिनेता जिम सरभ चार्ल्सच्या भूमिकेत आहे. यानिमित्त नुकतंच मनोज वाजयेपींनी मुलाखत दिली. तेव्हा त्यांनी मुंबई सोडण्यावर वक्तव्य केलं. एका मुलाखतीत सिनेमाविषयी तो म्हणाला, जेव्हा मला सिनेमाची स्क्रिप्ट मिळाली तेव्हा वाटलं की एक गंभीर थ्रिलर फिल्म असेल. पोलिसांच्या संघर्षाची कथा असेल. पण जेव्हा मी स्क्रिप्ट वाचली तेव्हा फार मजा आली. मला सारखं हसू येत होतं. स्क्रिप्टमध्ये कॉमेडी बळजबरी घुसवली आहे असं कुठेच वाटलं नाही. यात अभिनय करताना काहीतरी नवीन करायची संधी मिळेल असंही वाटलं. मनोज वाजपेयींना प्रश्न विचारण्यात आला की, 'कधी इंडस्ट्री किंवा मुंबई सोडून जाण्याचा विचार आला का?' यावर ते म्हणाले, अभिनयापासून दूर जाईन असा विचार तर माझ्या मनात कधीच आला नाही. माझं अभिनयावर खूप प्रेम आहे. पण मुंबईसारखं मोठं शहर हे माझ्या आवाक्याबाहेरचं आहे असं नक्कीच वाटलं. मुंबईत कधीच मला आपलेपणा वाटला नाही. मी आजपर्यंत या मोठ्या शहराचा होऊ शकलो नाही त्यामुळे सगळं सोडून जायचं अनेकदा मनात आलं. एक वय असं येईल जेव्हा मी खरंच हे शहर सोडेन आणि माझ्या गावी जाईन, असेही तो म्हणाला.

# 'जी ले जरा' सिनेमा डबाबंद?

'जी ले जरा' हा बहुप्रतिक्षित सिनेमाची सर्वांनाच उत्सुकता आहे. काही वर्षांपूर्वी फरहानने या सिनेमाची घोषणा केली होती. आलिया भट, कतरिना कैफ आणि प्रियांका चोप्रा अशी स्टारकास्ट यामध्ये असणार होती. या तीन आघाडीच्या अभिनेत्री एकाच सिनेमात येणार म्हटल्यावर प्रेक्षक आतुर झाले होते. मात्र नंतर सिनेमाबद्दल पुढे काहीच अपडेट आलं नाही. आता नुकतंच फरहानने सिनेमावर भाष्य केलं आहे. एका पॉडकास्टमध्ये फरहान अख्तरला 'जी ले जरा' सिनेमाविषयी अपडेट विचारण्यात आलं. यावर तो म्हणाला, जी ले जरा सिनेमा बंद झालाय असं मी म्हणणार नाही. एवढंच म्हणेन की, हा सिनेमा सध्या मागे राहिला आहे. हा सिनेमा नक्की बनेल. कधी ते सांगू शकत नाही. सिनेमाची स्क्रिप्ट अप्रतिम आहे. सिनेमाचं बरंचसं काम झालं आहे. मी सगळे लोकेशन फायनल केले आहेत. सिनेमाचं संगीतही रेकॉर्ड झालं आहे. आता सिनेमा सुरु पुन्हा सुरु करण्यासाठी मी योग्य वेळेची वाट बघत आहे. आता मी सिनेमाच्या कास्टवर बोलू शकत नाही. कारण आता सिनेमात कोण येईल पुढे काय होईल ते सांगता येणार नाही. पण सिनेमा नक्कीच बनेल यात शंका नाही.

'जी ले जरा' सिनेमा हा 'जिंदगी ना मिलेगी दोबारा'सारखाच असणार आहे. फक्त ही तीन मित्रांची नाही तर तीन मैत्रिणींची रोड ट्रीप असणार आहे. हा सिनेमा कधी बनणार यासाठी आता चाहत्यांना आणखी वाट बघावी लागणार आहे. दरम्यान फरहान अख्तर आगामी '१२० बहादुर' सिनेमात दिसणार आहे. चित्रपट १९६२ मधील रेझांग ला येथील खऱ्या युद्धावर आधारित आहे, जिथे फक्त १२० भारतीय जवानांनी हजारो शत्रूंचा मुकाबला करत इतिहास रचला. फरहान अख्तरचा गंभीर, समंजस आणि हृदयस्पर्शी अभिनय मेजर शैतान सिंह यांच्या रूपात विशेष लक्षवेधी ठरत आहे.



# लग्न ही सगळ्यात अवघड गोष्ट



शिल्पा शेट्टी ही बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. अनेकदा सोशल मीडियावरील तिचे व्हिडीओ लक्ष वेधून घेतात. तसेच अभिनेत्री तिच्या फिटनेससाठीदेखील ओळखली जाते. तिच्या योगाभ्यासाचे व्हिडीओ ती सोशल मीडियावर शेअर करताना दिसते.

आता अभिनेत्री पती राज कुंद्रामुळे चर्चेत आली आहे. राज कुंद्राने नुकतीच एक मुलाखत दिली. या मुलाखतीत राज कुंद्राने शिल्पा शेट्टीबाबत वक्तव्य केले. राज कुंद्रा म्हणाला, गेल्या १५ वर्षात आमच्या आयुष्यात चढ- उतार आले. पण, आम्ही कायमच एकमेकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिलो. कोणत्याही नात्यात हेच अपेक्षित असते. जर ते धरुन ठेवावं लागत असेल तर ते कशा प्रकारचं नातं आहे? जर तुमचं तुमच्या जोडीदारावर प्रेम असेल तर ते नात्यातही असतं. तो किंवा ती व्यक्ती जर तुमची असेल, तर कायमच तुमच्याकडे परत येईल. जर समोरच्या व्यक्तीला तुमच्या आयुष्यातून जायचं असेल, तिला जाऊ द्या.

लग्न ही सगळ्यात अवघड गोष्ट असते. लग्नानंतर दोन-तीन वर्षे प्रेम राहतं. त्यानंतर तुम्ही पालक बनता. तुमच्यावर जबाबदाऱ्या येतात. तुम्हाला तुमचे नाते मजबूत ठेवण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. शिल्पा आणि मी एका गोष्टीची खूप काळजी घेतो, ती म्हणजे आम्ही आमची शुक्रवारची डेटनाइट चुकवत नाही. आम्ही दर शुक्रवारी रात्री बाहेर जातो.

एकमेकांबरोबर वेळ घालवतो. माझी मुले विचारतात की तुम्ही कुठे जात आहात, तेव्हा मी त्यांना सांगतो की आतापर्यंत मी तुमच्याबरोबर वेळ घालवला. आता मी आईबरोबर वेळ घालवणार आहे. मी नेहमी शिल्पाला सांगतो की भारतातील आई-वडील त्यांच्या मुलांना खूप महत्व देतात.

पुढे राज कुंद्रा म्हणाला, मी सगळ्यांना हे सांगू इच्छितो की तुमचे तुमच्या जोडीदाराबरोबर नाते चांगले खूप महत्वाचे असते. कारण, मुलं मोठी झाल्यानंतर ते लग्न करून दुसरीकडे जातात. त्यामुळे, तुम्ही फक्त तुमच्या मुलांचे संगोपन करण्यातच खूप वेळ देत असाल तर तुमचे तुमच्या जोडीदाराबरोबरचे नाते तितके घट्ट राहणार नाही. तुम्हाला नंतर या गोष्टीचा पश्चाताप होईल की तुम्ही तुमच्या जोडीदाराला पुरेसा वेळ दिला नाही. त्यामुळे मला असे वाटते की तुम्ही तुमच्या जोडीदाराला प्राथमिकता दिली पाहिजे. शिल्पाने २२ नोव्हेंबर २००९ रोजी उद्योगपती राज कुंद्रा यांच्याशी लग्न केले. त्यांना दोन मुले आहेत.

राजला भेटण्यापूर्वी शिल्पा बॉलिवूडची लोकप्रिय अभिनेत्री होती. दरम्यान, राज कुंद्रा लवकरच पंजाबी चित्रपट 'मेहर' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाची राजच्या चाहत्यांना उत्सुकता लागली आहे.



# 'मुंज्या २' मधून शर्वरीचा पत्ता कट होणार?

मराठमोळा दिग्दर्शक आदित्य सरपोतदार यांच्या मुंज्या या सिनेमाने बॉक्स ऑफिवर धूमाकूळ घातला होता. या सिनेमाला प्रेक्षकांनी चांगला प्रतिसाद दिला होता. ७ जून रोजी रिलीज झालेल्या या सिनेमाची बरीच चर्चा झाली होती. या सिनेमातील अभिनेत्री शर्वरी वाघ आणि अभय वर्मा यांची नवी जोडी प्रेक्षकांना खूप आवडली होती.

मुंज्याच्या घवघवीत यशानंतर या सिनेमाचा सीक्वल लवकरच येणार असल्याची चर्चा रंगू लागली होती. आता या सिनेमाविषयी एक मोठी अपडेट समोर आली आहे. मुंज्याच्या सिक्वलमधून अभिनेत्री शर्वरी वाघ हिचा पत्ता कट होण्याची शक्यता आहे, याबाबत माध्यमांत माहिती समोर आली आहे. तर तिच्या जागी लापता लेडीज अभिनेत्रीची मुंज्या २ मध्ये एन्ट्री होण्याची दाट शक्यता वर्तविण्यात आली आहे. मात्र, याबाबत अद्यापर्यंत सिनेमाच्या टीमकडून अधिकृत सांगण्यात आलेलं नाही.

जर शर्वरीचा सिनेमातून पत्ता कट झाला तर लापता लेडीज फेम अभिनेत्रीला याचा मोठा फायदा होऊ शकतो. मिडिया रिपोर्टनुसार, मुंज्या सिनेमाच्या सिक्वलमध्ये लापता लेडीज फेम अभिनेत्री प्रतिभा रांटाची एन्ट्री होऊ शकते. मुंज्या २ च्या कथेवर काम सुरू असून, कथा आणखी रंजन बनविण्यासाठी नवी व्यक्तिरेखा जोडण्यात आली आहे. पहिल्या भागाचं कनेक्शन दुसऱ्या भागाची जोडण्यात आलं आहे. लवकरच मुंज्या सिनेमाच्या सिक्वलच्या शुटिंगला सुरुवात होणार आहे. हा एक हॉरर कॉमेडी सिनेमा असणार आहे. दुखावण्याचा तिचा कोणताही हेतू नव्हता. अलीकडच्या काळात मृणाल वेगाने प्रसिद्धीच्या झोतात आली आहे. तिला अनेक चांगले चित्रपट मिळाले आहेत आणि तिच्या अभिनयाचेही कौतुक झाले आहे.



# दुप्पट पैसे मिळत असतानाही अमृताने नाकारली भूमिका?

अमृता सुभाष ही मराठी सिनेसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री. अभिनयाच्या जोरावर तिने केवळ मराठीच नाही तर हिंदी सिनेसृष्टीतही स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली. अमृताने अनेक सुपरहिट सिनेमा आणि वेब सीरिजमध्येही काम केलं आहे. प्रत्येकवेळी ती एका वेगळ्या भूमिकेत दिसली. पण, एका भूमिकेसाठी भरभक्कम मानधन मिळत असूनही अभिनेत्रीने भूमिकेला स्पष्ट नकार दिला. नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत अमृताने यामागचं कारण सांगितलं. अमृताने नुकतीच एक मुलाखत दिली. या मुलाखतीत तिला एक विशिष्ट भूमिका साकारल्यानंतर तशाच पद्धतीच्या भूमिका ऑफर होतात. टाइपकास्ट केलं जातं. अशावेळी भूमिकेला नकार दिला आहेस का? असा प्रश्न तिला विचारण्यात आला. यावर उत्तर देताना अमृता म्हणाली, हो, पण जर कंटेट चांगला असेल तर मी टाइपकास्ट होण्याचा फारसा विचार करत नाही. हा पण मी अशी भूमिका नाकारली आहे ज्यासाठी मला चांगले पैसे मिळत होते. माझ्या बँक बॅलेन्सपेक्षा दुप्पट मानधन ते मला देत होते. पण, त्या भूमिकेत मला वेगळं काहीच दिसत नव्हतं. त्यामुळे मी भूमिकेला नकार दिला. पण, जर कंटेट चांगला असेल तर खूप गोष्टींचा विचार मी करत नाही. मी अशा सिनेमांनाही नाकार दिला आहे ज्यासाठी मला चांगले पैसे मिळत होते. पण, त्यात काहीच नाविन्य नव्हतं. पण, जर जारण सिनेमासारखा कंटेट असेल तर छोटं प्रोडक्शन असूनही मी सिनेमा करते. मी जितके पैसे घेते तेवढे ते मला देऊ शकत नाहीत. पण, तरीही मी करते कारण कंटेट चांगला असतो, असंही अमृता पुढे म्हणाली.

# 'या' मराठी अभिनेत्रीला करावा लागला वर्णभेदाचा सामना

मनोरंजन विश्वात काम करत असताना अनेकदा कलाकारांना चांगले- वाईट अनुभव येतात. अनेक कलाकारांना रंगामुळेही भेदभावाला सामारं जावं लागते. एखादी व्यक्ती कितीही कौशल्यवान असली तरी रंग-रुप जास्त महत्त्वाचं मानलं जातं, टॅलेंट असूनही रंगामुळे डावललं जातं.

मराठीसह बॉलिवूडमध्ये आपल्या अभिनयाची छाप उमटवणाऱ्या एका मराठमोळ्या अभिनेत्रीने इंडस्ट्रीतील भयाण वास्तव मांडलं आहे. या अभिनेत्रीचं नाव मंजिरी पुपाला आहे. धडक २, सुपरबॉईज ऑफ मालेगाव यांसारख्या चित्रपटांमधून काम करत मंजिरी पुपाला प्रसिद्धीझोतात आली. 'दिल दोस्ती दुनियादारी' या मालिकेतही तिने काम केले आहे. छोट्या पडद्यापासून सुरुवात करणाऱ्या मंजिरीने आज लोकप्रियतेचे शिखर गाठलं. एका मुलाखतीमध्ये या अभिनेत्रीने इंडस्ट्रीत तिला वर्णभेदाचा सामना करावा लागला, असं भाष्य केलं आहे. सावळ्या रंगामुळे आपल्या वाट्याला कायम मोलकरणीच्या भूमिका आल्या असंही तिने या मुलाखतीत सांगितलं. या मुलाखतीमध्ये अभिनेत्री पुढे म्हणाली, माझ्या डोक्यात कायम एकच विचार असायचा की, मी नाटकात काम करु शकेन. मात्र, मला कधीच कॅमेरासमोर काम करणं जमणार नाही. सावळ्या रंगामुळे माझ्या मनात न्युनगंड निर्माण झाला होता.



पुढे अभिनेत्री म्हणाली, केवळ गोरा रंग असणं म्हणजे खरं सौंदर्य. लहानपणापासून याच गोष्टी आपल्या मनावर बिंबवण्यात आल्या आहेत. मात्र, सावळ्या रंगामुळे मी कधीच कॅमेरा फेस करू शकत नाही,असंच मला वाटत होतं. त्यामुळे ऑडिशन देण्यासाठी मला अडचणी यायच्या. जेव्हा एखाद्या मोठं पात्र साकारण्याची संधी मिळाली तर त्यासाठी गोरा रंग असलेल्यांना कास्ट केलं जायचं. ही त्यांची डिमांड असायची. त्यामुळे मी त्यासाठी ऑडिशन देताना मनात शंका असायची. काही वेळा तर रिजेक्ट केलं जायचं याविषयी बोलताना अभिनेत्रीने म्हटलं, त्याच-क्षणी मी ठरवलं, मी माझ्या रंगामुळे एखाद्या भूमिकेसाठी माझी निवड झाली तर निदान ती भूमिका चांगली असावी. कित्येकदा लीड रोलसाठी ऑडिशन देण्यासाठी गेले आणि मला मोलकरणीच्या भूमिकाच ऑफर झाल्या. असा खुलासा तिने केला. ओटीटी आल्यानंतर हे चित्र बदलल्याचे तिने सांगितले.

# अशी होती प्रिया मराठे -शंतनूची लव्हस्टोरी

छोट्या पडद्यावरील मालिका आणि वेब सीरिजमधून घराघरात पोहोचलेली अभिनेत्री प्रिया मराठेचे नुकतेच निधन झाले आहे. काही काळापासून ती कर्करोगाने त्रस्त होती. ३१ ऑगस्ट रोजी पहाटे चार वाजता तिने अखेरचा श्वास घेतला. प्रिया केवळ ३८ वर्षांची होती. तिच्या निधनाने संपूर्ण कलाविश्वावर शोककळा पसरली.

प्रिया मराठेने अनेक मालिकांमध्ये काम केले आहे. 'या सुखांनो या' ही तिची पहिली मालिका होती. त्यानंतर हिंदी मालिकांमध्येही ती झळकली होती. प्रियाच्या मालिकांबरोबरच तिचे खासगी आयुष्यदेखील चर्चेत असायचे. प्रिया आणि शंतनू यांची लव्हस्टोरीदेखील खूप हटके आहे. एका जवळच्या मैत्रिणीमुळे त्यांची ओळख झाली होती. २४ एप्रिल २०१२ रोजी प्रिया ज्येष्ठ अभिनेते श्रीकांत मोघेंची सून झाली. श्रीकांत मोघे यांचा मुलगा व अभिनेता शंतनू मोघे याच्याबरोबर प्रियाचे अगदी थाटात लग्न झाले. मात्र, त्यांची लव्हस्टोरी नेमकी कशी सुरू झाली होती हे फार कमी लोकांना माहीत आहे. प्रिया मूळची ठाण्याची. शूटिंगसाठी ती अंधेरीत राहत असे. तिची रूममेट शर्वरी लोहकरेमुळे तिची शंतनूबरोबर ओळख झाली. शर्वरी आणि शंतनू 'आई' मालिकेत एकत्र काम करीत होते. मालिकेच्या शेवटच्या दिवसांत झालेल्या पार्टीत पहिल्यांदा प्रिया आणि शंतनूला जास्त वेळ एकत्र बोलायची संधी मिळाली. त्या रात्रीच्या गप्पांनी दोघांच्याही आयुष्यात एक नवा अध्याय सुरू झाला. हळूहळू फोन, मेसेजेस सुरू झाले. रोजचे बोलणे मैत्रीपलीकडे जाऊन वेगळ्या नात्याचे रूप घेऊ लागले. दीड वर्ष डेट केल्यानंतर शंतनूने प्रियाला फिल्मी स्टाईलने प्रपोज केले होते. तो तिला फिल्मसिटीतील एका जागी घेऊन गेला. चांदण्याच्या प्रकाशात गुडघ्यांवर बसत शंतनूने प्रियाला प्रपोज केले होते. प्रियाही त्याच्यावर तितकीच जिवापाड प्रेम करीत होती. त्यामुळे हो म्हणायला तिला वेळच लागला नाही; पण काही काळ दोघांनीही आपले नाते गुपित ठेवण्याचा निर्णय घेतला होता. दोघांच्या या नात्याबद्दल घरच्यांना काही कल्पना नव्हती; मात्र एका पुरस्कार सोहळ्यात शंतनूने स्टेजवरच प्रियाचे नाव घेतले आणि गोष्ट घरच्यांपर्यंत पोहोचली. दोन्ही कुटुंबांनीही या नात्याला होकार दिला. शेवटी २४ एप्रिल २०१२ रोजी या दोघांचे लग्न थाटामाटात पार पडले. प्रिया आणि शंतनूची ही लव्हस्टोरी साधी असली तरी त्यात खरी गोडी आहे; ना घरच्यांचा विरोध, ना अडथळे. मात्र, आता प्रियाच्या जाण्यामुळे शंतनू आणि कुटुंबावर मोठी शोककळा पसरली आहे. २००५ साली 'या सुखांनो या' या मराठी मालिकेमधून प्रिया मराठेने छोट्या पडद्यावर पदार्पण केले. त्यानंतर 'चार दिवस सासूचे', 'तू तिथे मी', 'तुझेच मी गीत गात आहे' या मालिकांमधील तिच्या भूमिकांनी प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. विशेषतः तिच्या नकारात्मक भूमिकांना प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला. हिंदी मालिकांमध्ये तिच्या प्रवासाची सुरुवात 'कसम से' या मालिकेतील 'विद्या बाली' या भूमिकेपासून झाली. पुढे 'पवित्र रिश्ता'मध्ये 'वर्षा' आणि 'बडे अच्छे लगते हैं'मध्ये 'ज्योती मल्होत्रा'च्या भूमिकांनी तिला घराघरात पोहोचवले.





# राम चरण आणि अल्लू अर्जुनमध्ये यामुळे होता १८ वर्षे अबोला

अल्लू अर्जुन आणि राम चरण हे दोघेही दक्षिण चित्रपटसृष्टीतील सुपरस्टार आहेत. प्रत्येक चित्रपटात दमदार भूमिका साकारून लोकांना वेड लावतात. हे दोन्ही अभिनेते चुलत भाऊ आहेत. एकमेकांशी प्रेमळ नाते आहे. पण तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की एकेकाळी त्यांच्यात इतका वाद झाला होता की १८ वर्षे त्यांचे बोलणे थांबले होते. जाणून घ्या संपूर्ण प्रकरण काय आहे. खरं तर ही घटना २००७ सालची आहे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, त्यावेळी अल्लू अर्जुनचे मन अभिनेत्री नेहा शर्मावर पडले होते, जी इमरान हाश्मीसोबत 'क्रूक' चित्रपटात दिसली होती आणि दोघेही रिलेशनशिपमध्ये होते. दरम्यान, राम चरणने नेहासोबत 'चिरुथा' चित्रपटात काम केले. येथूनच त्यांच्या नात्यात दुरावा आला. 'चिरुथा' मध्ये काम करत असताना, राम चरण अभिनेत्री नेहाशी जवळीक साधली. त्यांची जवळीक वाढू लागली. अल्लूला याची जाणीव होताच तो संतापला. एका वृत्तानुसार, नेहा शर्माबद्दल दोन्ही भावांमध्ये बरीच चर्चा झाली होती. या वादाचा परिणाम असा झाला की दोघांमधील संवाद थांबला. वृत्तानुसार, दोन्ही कलाकार सुमारे १८ वर्षांपासून एकमेकांशी बोलत नव्हते. तथापि, आता दोन्ही भावांमधील नाते खूप चांगले आहे. दोघेही अनेकदा लग्न आणि पार्ट्यांमध्ये एकत्र दिसतात. राम चरण हा दक्षिणेचा सुपरस्टार चिरंजीवीचा मुलगा आहे. तो नात्यात अल्लूचा चुलत भाऊ आहे. कामाच्या बाबतीत बोलायचे झाले तर, राम चरण शेवटचा 'गेम चेंजर' चित्रपटात कियारा अडवाणीसोबत दिसला होता. त्याच वेळी अल्लू अर्जुन 'पुष्पा २' मध्ये दिसला होता. त्याचा चित्रपट ब्लॉकबस्टर हिट ठरला होता. याबाबत म्हणाला, त्यावेळी मला किरण विचारत होती की, तुला झोप कशी येत आहे तेव्हा मी म्हटलं की, मला चित्रपटाची जराही काळजी नाहीये. कारण मला माहीत आहे की, हा चित्रपट चालणारच नाही. मलाच तो आवडला नाही. त्यामुळे मी प्रेक्षकांना आवडेल, अशी अपेक्षा का करू.

# विजय सेतुपतीचा आणखी एक धमाका



सध्या ओटीटी प्लॅटफॉर्मवर एकापेक्षा एक सरस चित्रपट आणि वेब सीरिज येत आहेत, ज्यामुळे प्रेक्षकांना मनोरंजनाचा भरपूर खुराक मिळत आहे. सस्पेन्स, थ्रिलर आणि ॲक्शन चित्रपटांचा विचार केल्यास, दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टी नेहमीच आघाडीवर असतात. म्हणूनच, सध्या ओटीटीवर दाक्षिणात्य चित्रपटांची क्रेझ मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. असाच एक चित्रपट आला आहे, ज्याची कथा तुम्हाला खिळवून ठेवेल. विजय सेतुपती आणि नित्या मेनन यांच्या मुख्य भूमिका असलेल्या या चित्रपटाची कथा आणि अभिनयाची खूप प्रशंसा होत आहे. विजय सेतुपती आणि नित्या मेनन यांच्या 'Thalaivan Thalaivii' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर आणि ओटीटीवरही धुमाकूळ घातलाय. फक्त २५ कोटी रुपयांच्या बजेटमध्ये बनलेल्या या चित्रपटाने जगभरात १०० कोटी रुपयांची कमाई केली. म्हणजेच, चित्रपटाने आपल्या खर्चाच्या चौपट कमाई केलीय. ही कथा कमी शिकलेल्या हॉटेल मालक 'अगसवीरन' (विजय सेतुपती) आणि 'पेरारसी' (नित्या मेनन) यांच्याबद्दल आहे. कुटुंबाच्या संमतीने त्यांचे लग्न होते. सुरुवातीला त्यांच्यात प्रेम असतं. पण, लवकरच त्यांच्यात मतभेद आणि तणाव निर्माण होतो. वाद वाढल्याने पेरारसी तिच्या माहेरी परत जाते, ज्यामुळे दोन्ही कुटुंबांमध्ये अधिक वाद होतात. या चित्रपटात पती- पत्नीच्या नात्यातील चढ- उतार अतिशय सुंदरपणे दाखवले आहेत. १ ऑगस्ट २०२५ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने पहिल्या दिवसापासूनच प्रेक्षकांना आकर्षित केलं. २२ ऑगस्ट २०२५ रोजी अमेझॉन प्राइम व्हिडीओवर प्रदर्शित झाल्यानंतर 'थलाईवी' टॉप १० चित्रपटांच्या यादीत पहिल्या क्रमांकावर आहे. हा चित्रपट हिंदीमध्येही उपलब्ध आहे, ज्यामुळे तो देशभरातील प्रेक्षकांना आकर्षित करत आहे.

# नागार्जुनच्या शंभराव्या चित्रपटाची घोषणा



रजनीकांत यांचा अलिकडेच प्रदर्शित चित्रपट 'कुली'मध्ये सुपरस्टार नागार्जुन दिसून आले. या चित्रपटातील नकारात्मक छटेच्या त्यांच्या भूमिकेचे कौतुक झाले. आता नागार्जुन यांनी स्वत:च्या आगामी चित्रपटाची घोषणा केली आहे. हा त्यांचा शंभरावा चित्रपट असणार आहे. नागार्जुन यांच्या शंभराव्या चित्रपटाचे दिग्दर्शन कार्तिक यांच्याकडून केले जाणार आहे. याचे नाव सध्या 'किंग १००' ठेवण्यात आले आहे. या चित्रपटाची तयारी मागील ६-७ महिन्यांपासून सुरू आहे. तमिळ दिग्दर्शक कार्तिकने एक वर्षापूर्वी याची कहाणी ऐकविली होती. हा एक आकर्षक चित्रपट असून तो ॲक्शन दृश्यांनी नटलेला असेल असे नागार्जुन यांनी सांगितले आहे. स्वत:च्या १०० व्या चित्रपटात नागार्जुन हे मुख्य नायकाच्या भूमिकेत असतील. नागार्जुन हे यापूर्वी कुली चित्रपटात रजनीकांत, सौबेन शाहिर, उपेंद्र कुमार, आमिर खान आणि श्रुती हासनसोबत दिसून आले होते. या चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर संमिश्र यश मिळाले आहे.




# बाळासाहेब ठाकरेंच्या नातवाची बॉलिवूडमध्ये एन्ट्री !

अभिनेता सर्वात प्रसिद्ध आणि शक्तिशाली राजकीय कुटुंबांपैकी एक असलेल्या ठाकरे कुटुंबातील एक सदस्यानं राजकारणात नाही तर थेट बॉलिवूडमध्ये एन्ट्री घेतली आहे. शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांचा नातू ऐश्वर्य ठाकरे हा बॉलिवूडमध्ये डेब्यू करतोय. त्याच्या 'निशांची' चित्रपटाचा दमदार ट्रेलर आज प्रदर्शित झाला आहे. विशेष म्हणजे अनुराग कश्यपनं या चित्रपटाचं दिग्दर्शन केलंय. 'निशांची' हा एक अस्सल मसालापट आहे. या ट्रेलरमध्ये ऐश्वर्य दुहेरी भूमिकेत दिसतोय. त्यानं बबलू आणि डबलू या जुळ्या भावांची भूमिका साकारली आहे. 'निशांची'च्या ट्रेलरमध्ये ॲक्शन, ड्रामा, रोमान्स, कॉमेडी आणि कौटुंबिक भावनांचा सुरेख संगम पाहायला मिळतोय. ट्रेलर पाहिल्यानंतर चाहते चित्रपट पाहण्यासाठी उत्सुक झालेत. या चित्रपटात वेदिका पिंटो, मोनिका पंवार, मोहम्मद जीशान अय्यूब आणि कुमुद मिश्रा यांच्याही प्रमुख भूमिका आहेत. अमेझॉन एमजीएम स्टुडिओज् इंडियाने निर्मित केलेला हा चित्रपट १९ सप्टेंबर रोजी सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. दिग्दर्शक अनुराग कश्यप म्हणाले, अमेझॉन एमजीएम स्टुडिओज् इंडियासोबत काम करण्याचा अनुभव खूप चांगला होता. त्यांनी माझ्यावर पूर्ण विश्वास ठेवला. ऐश्वर्य, वेदिका, मोनिका, झिशान, कुमुद आणि संपूर्ण टीमने केवळ अभिनयच नाही, तर या पात्रांना जगले आहे. त्यांच्या कामातील तळमळ आणि प्रामाणिकपणा या चित्रपटात दिसून येतो. त्यांनी पुढे सांगितले की, चित्रपटाचे संगीत आणि कथा प्रेक्षकांना नक्कीच आवडेल. ऐश्वर्य गेल्या काही वर्षांपासून सिनेइंडस्ट्रीत काम करतोय. त्यानं संजय लीला भन्साळी यांच्या 'बाजीराव मस्तानी' चित्रपटासाठी सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम पाहिले होते. ऐश्वर्य हा स्मिता ठाकरे यांचा धाकटा मुलगा आहे. स्मिता यांनी 'हसिना मान जाये' या सिनेमाची निर्मिती केली होती.

# राजमौली म्हणतात, बाहुबली बनवणे सोपे नव्हते!

निर्माता- दिग्दर्शक एसएस राजामौली यांचा 'बाहुबली' हा चित्रपट दोन भागात प्रदर्शित झाला. हा भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील सर्वात मोठ्या आणि महाकाव्य चित्रपटांपैकी एक आहे. या दोन्ही चित्रपटांमधील प्रत्येक दृश्य लोकांना आवडते. आता राजामौली यांनी या दोन्ही चित्रपटांना एकत्र करून एक चित्रपट बनवला आहे आणि त्याचे नाव 'बाहुबली: द एपिक' असे ठेवले आहे. तथापि, राजामौलींसाठी दोन चित्रपट एकत्र करून चित्रपट बनवणे इतके सोपे नव्हते. आता दिग्दर्शकाने या संदर्भात येणाऱ्या आव्हानांबद्दल सांगितले आहे. 'बाहुबली: द बिगिनिंग' आणि 'बाहुबली: द कन्क्लुजन' एकत्र करून 'बाहुबली: द एपिक' बनवणे राजामौलींसाठी खूप कठीण होते. कारण दोन्ही चित्रपट त्यांचे आहेत आणि दोन्ही चित्रपट त्यांच्या हृदयाच्या खूप जवळ आहेत. अशा परिस्थितीत, 'बाहुबली: द एपिक' बद्दल राजामौली म्हणतात की, एकाच भागात दोन चित्रपट बनवणे सोपे काम नाही आणि त्यासाठी टीमला अनेक त्याग करावे लागले. दिग्दर्शकाने सांगितले की बाहुबलीचा प्रत्येक सीन आणि गाणे माझ्यासाठी मौल्यवान आहे. अंतिम निवड करणे सोपे काम नव्हते आणि आम्ही अनेक दिवस अनेक वादविवाद आणि जोरदार वादविवादांमधून गेलो. हा आतापर्यंतचा सर्वात कठीण प्रवास आहे कारण 'बाहुबली: द एपिक'च्या अंतिम आवृत्तीतून काय काढायचे हे ठरवणे कठीण होते. बाहुबलीची काही गाणी काढून टाकण्यात आली. असे वृत्त आहे की 'बाहुबली: द बिगिनिंग' मधील प्रभास आणि तमन्ना यांच्यात चित्रित केलेले रोमँटिक गाणे 'बाहुबली: द एपिक' मधून काढून टाकण्यात आले आहे. खरंतर, दोन्ही चित्रपट एकाच चित्रपटात एकत्र करण्यासाठी आणि त्याची लांबी जास्त वाढू नये म्हणून, दोन्ही चित्रपटांमधून अनेक सीन काढून टाकण्यात आले आहेत. 'बाहुबली: द एपिक' हा चित्रपट ३१ ऑक्टोबर रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. नुकताच या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाला, जो पाहून चाहते या चित्रपटासाठी खूप उत्सुक आहेत. 'बाहुबली: द एपिक'चा शेवटचा रनटाइम सुमारे चार तासांचा असल्याचे सांगितले जाते.





# रणबीर आणि वांगांचा 'ॲनिमल पार्क'साठी दमदार प्लॅन

रणबीर कपूर सध्या बॉलिवूडमध्ये सर्वात आघाडीवर आहे. 'ॲनिमल'च्या यशानंतर त्याचा भाव वधारला आहे. या सिनेमातील त्याच्या इंटेन्स लूकने सर्वांनाच आश्चर्यचकित केलं. संदीप रेड्डी वांगा दिग्दर्शित या सिनेमाने रणबीरचं करिअर पुन्हा रुळावर आलं. यानंतर त्याच्याकडे सिनेमाच्या ऑफर्सची रांगच लागली. 'ॲनिमल'च्या शेवटी याच्या सीक्वेलचीही हिंट देण्यात आली होती. 'ॲनिमल पार्क' असं सीक्वेलचं नाव असणार आहे.

नुकतंच याबद्दल नवीन अपडेट समोर आली आहे. सध्या रणबीर कपूर संजय लीला भन्साळींच्या 'लव्ह अँड वॉर' सिनेमात व्यग्र आहे. याआधी त्याने नितेश तिवारींच्या 'रामायण पार्ट १'चं शूट पूर्ण केलं आहे. तर दुसरीकडे संदीप रेड्डी वांगा प्रभाससोबत 'स्पिरीट'चं शूट करत आहेत. त्यांनी सिनेमासाठी ६ महिन्यांचा प्लॅन तयार केला आहे. प्रभासच्या लूकमध्ये मोठा बदल करण्यात येणार आहे. तो वजन कमी करणार असून हेअरस्टाईलमध्येही बदल करणार आहे. तसंच त्याची ड्रेसिंग स्टाईल कधीही न पाहिलेली अशी असेल. प्रभासच्या या सिनेमाचं शूटिंग एक शेड्युलमध्येच पूर्ण होणार आहे. ६ महिन्याच्या आतच ते संपेल. तर इकडे लव्ह अँड वॉरचंही शेड्युल संपेल. यानंतर रणबीर आणि वांगा 'ॲनिमल पार्क'साठी दमदार प्लॅन तयार करणार आहेत. पुढील वर्षीच्या मध्यापर्यंत सिनेमाचं काम सुरु होऊ शकतं अशी चर्चा आहे. मेकर्सकडून अद्याप कोणतंही अधिकृत स्टेटमेंट आलेलं नाही.

'ॲनिमल पार्क' मध्ये रणबीर कपूर हिरो आणि खलनायक अशा डबल रोलमध्ये दिसण्याची शक्यता आहे. तसंच तृप्ती डिमरीही सिनेमाचा महत्वाचा भाग असेल. बॉबी देओल पार्ट २ मध्ये दिसणार नाही कारण त्याचा पहिल्याच पार्टमध्ये मृत्यू दाखवण्यात आला. तसंच रश्मिकाबद्दल अद्याप काहीही अपडेट आलेलं नाही. 'ॲनिमल' सिनेमाने ९०० कोटी कमावले होते. मात्र तेवढीच सिनेमावर टीकाही झाली होती. सलग फ्लॉप सिनेमांनंतर रणबीरला 'ॲनिमल' सिनेमानेच तारलं होतं. आता त्याच्या आगामी सर्वच सिनेमांची चाहत्यांमध्ये उत्सुकता आहे. क्रिकेटप्रेमी उत्सुक आहेत.

# सात्विक, सोज्वळ सौंदर्यखणी
# बिना रॉय

'ओ ऽऽ काली घटा घीर आयी रे...' नायकाने दिलेल्या साथीला बिना रॉय पण ओऽऽऽ...ची साथ देऊन 'बजने लगी शहनाई रे' असा प्रतिसाद १९५१ सालच्या 'काली घटा' या चित्रपटात देतात. ओऽऽ च्या आलापीत निसर्गाच्या सान्निध्यात नि:शब्द शांती, नदीचा अद्भुत गाज, जणू निसर्गाला कवेत घेऊन उत्कृष्ट आविर्भावात व अत्यानंदात नाव वल्हवित जाताना 'देरेना...देरेना' या अनोख्या शब्दांचे तरंग उठविल्यावर हातातील वल्हे सोडून नायकाची खट्याळपणे मजा घेतात. किशोर शाहू हे नायक निर्माते व निर्देशक आहेत. अशारीतीने पदार्पणातच आपले अभिनय कौशल्य बिना रॉय प्रकट करतात.

'अपना पता बता दे। या मेरे पास आजा। दिल है उदास आ जाऽऽ' पी. एन. प्रॉडक्शनच्या 'शगुफा' चित्रपटात प्रेमनाथ यांच्या सोबत नायिका म्हणून काम करताना विव्हळ जीवनातील नैराश्य चेहर्यावरील आविर्भावात चपखलपणे प्रकट करून स्वतःला उत्तम अभिनेत्री सिद्ध करतात.



१९५०-६० च्या चित्रपटाच्या सुवर्णयुगात तत्कालीन दिग्गज कलाकारांना आपल्या अफलातून लावण्याने व अभिनयाने वेड लावणाऱ्या दोन लावण्य लतिका होत्या. एक मधुबाला व दुसऱ्या बिना रॉय. प्रेमनाथ व प्रदीपकुमार हे ज्येष्ठ अभिनेते तर बिना रॉयसाठी वेडे झाले होते. अखेर प्रेमनाथ यांनी बाजी जिंकली व ते बिना रॉयशी विवाहबद्ध झाले. स्वतः रूपमती असूनही चेहऱ्यावरील शीतल झळाळी व मांगल्य पोषाखी चित्रपटातदेखील कधी ढळू दिले नाही. बीभत्स, किळसवाणा आविष्कार याप-असून स्वतःला दूर ठेवले. अभिनयाची व सौंदर्याची सात्विक मूर्ती म्हणूनच त्यांची कारकीर्द घडली.

**'आजा अब तो आजा, मेरे किस्मत के खरीददार। अब तो... नीलाम हो रही है मेरी चाहत भरी बाजार। अब तो...'** १९५३ साली 'अनारकली' चित्रपटात अनारकलीचे पात्र साकार करण्याचा मान बिना यांनी पटकावला. त्यांना गुलाम म्हणून विकायला मीना बाजारात आणतात. तिथे जबरदस्तीने नाचायला लावतात, त्या नृत्यावरील हे गाणे आहे. बादशहा सलीम व्यापाऱ्याच्या वेशात तिला खरीदतो. हा प्रसंग 'मुघल-ए-आझम' चित्रपटात नाही. प्रियकराला स्वतःला यातून सोडविण्यासाठी आर्त विनवणी करते. असहाय दीनवानी अवस्थेतील व्यथा व कोडे खातानाची विव्हळता व्यक्त करताना या गाण्यात बिना यांनी अभिनयाची कसोटी पार केली आहे. गाण्यात अंतर्याच्या अखेरीस त्यांना कोडे (फटके) मारतात. कोडे मारतानाचा आवाज पार्श्वसंगीतात बेमालूम मिसळून सी. रामचंद्र यांनी कमाल केली आहे. 'ये जिंदगी उसी की है। जो किसी का हो गया। प्यार ही मे खो गया...' लता यांच्या कोकिळ स्वराने व सी. रामचंद्र यांच्या स्वर्गीय संगीताने अजरामर झालेले हे गाणे व त्यावरील प्रसंग चित्रपटाचा क्लायमॅक्स आहे. तब्बल ४ मिनिटे १२ सेकंदांचे हे गाणे दोन भागात आहे. सलीम व अनारकली हे दोन प्रेमीजीव प्रथम परस्परांना भेटतात तेव्हा म्हणतात... **'धडक रहा है दिल तो क्या। दिलकी धडकने ना गीन फिर कहाँ ये फुरसते। फिर कहाँ ये रात दिन... आ रही...।।'** पुढील सुखी जीवनातील आनंदाचे नेत्रातील सजीव भाव व दोघांच्या मिलनाचा प्रसंग. सारेच अद्भुत! दुसऱ्या भागात अनारकलीला भिंतीत छिनून मारताना एकेक वीट रचतानाच्या निर्वाणीच्या प्रसंगी अनारकली असहायपणे मनात साठवलेली वेदना प्रस्तुत करते. **'ये जिंदगी की शाम आ। तुझे गले लगाऊ मै तुझी मे डूब जाऊ मै।** जहाँ को भूल जाऊ मै बस एक नजर मेरे सनम, अलविदा.. अलविदा.. अलविदा...'

लता यांच्या स्वरातील निर्वाणीची शब्दकळा कोरड्या व शुष्क नेत्रात साठवून केवळ ओष्ठ्यांच्या हालचालीतून प्रकट करते. भिंत वर वर तयार होत असते व चेहरा झाकला जात असतो. तेव्हा कमी कमी होणारा स्वर अधिक बारीक होताना आढळतो. शेवटी 'अलविदा'ची तीन-चार वेळा पुकार होते, चेहरा पूर्णपणे झाकला जाताना सर्व शक्ती पणाला लावून ऐकू येणारा अलविदाचा स्वर आसमंतात गुंजतो व विरळून जातो. पदार्पणातच चित्रपटसृष्टीत पाय घट्ट रोवल्यामुळे बिना यांना चक्क महान कलाकार दिलीप कुमार व देव आनंदसोबत १९५५ साली 'इन्सानियत' चित्रपटात काम मिळाले.

१३ जुलै १९३१ रोजी लाहोर येथे क्रिष्णा सरीन उर्फ बिना रॉय यांचा जन्म झाला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हे कुटुंब लखनौ येथे आले. लाहोरला शालेय व लखनौला आय.टी. कॉलेजला शिक्षण झाले. लखनौला असताना मुंबईतील एका नाट्य प्रतियोगितेत भाग घेतला. त्यात त्यांना पुरस्कार मिळाला. निर्माते निर्देशक किशोर शाहू यांनी त्यांच्यातील गुणांची महती जाणली व त्यांना १९५१ च्या 'काली घटा' चित्रपटात एकदम नायिका केले. 'औरत' चित्रपटात काम करताना प्रेमनाथ यांच्यावर प्रेम जमले. प्रेमनाथ या ज्येष्ठ अभिनेत्यासोबत त्यांचा विवाह १९५२ साली झाला. प्रेमनाथ यांनी पी. एन. फिल्म नावाची कंपनी काढून चार चित्रपट बिनाला नायिका घेऊन काढलेत. त्यांना प्रेमकिशन व मॉन्टी ही दोन मुले झालीत. ३ नोव्हेंबर १९९२ रोजी प्रेमनाथ यांचे निधन झाले. १९६६ सालच्या 'दादी मां' चित्रपटात सर्वप्रथम आईचा अभिनय करून सिनेसृष्टीला अचंब्यात टाकले.

'गावोरी शुभ दिन आया। मंगल गावोरी। मिल के...'१९६७ सालच्या 'रामराज्य' चित्रपटात सीतेची भूमिका त्यांनी साकारली. सीतेच्या गरोदरपणी गोदभरणी समारंभात चंद्रकला नावाची सखी हे गाणे सीतेला उद्देशून म्हणते. देखणे राजबिंडे सौंदर्य, चेहऱ्यावरील मांगल्य व साजेसा अभिनय यामुळे त्यांनी रंगवलेली सीता लक्षणीय ठरली.

बिना रॉय यांनी १९५१ ते १९९१ पर्यंत ३० च्या जवळपास चित्रपटात कामे केलीत. प्रेमनाथ यांच्या निधनानंतर दोन्ही मुलांना घडविले. त्यांना १९५७ साली सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा फिल्म फेअर अवॉर्ड 'घुंगट' चित्रपटासाठी मिळाला. वयाच्या ७८ व्या वर्षी ६ डिसेंबर २००९ रोजी चित्रपटातील अनारकली कार्डीयाक अटॅक येऊन हे जग सोडून गेल्या व त्यांची तसबीर भिंतीवर लागली. या निर्जीव तसबिरीकडे पाहून साहिरचे शब्द आठवतात...**'जो बात तुझमे है। तेरी तसवीर में नही...'**

**रमेश पोफळी**

# मनोज बाजपेयी राम गोपाल वर्मासोबत पुन्हा करणार काम

मनोज बाजपेयी यांच्या एका हॉरर कॉमेडी चित्रपटाची चांगलीच चर्चा रंगली आहे. 'पुलिस स्टेशन में भूत' असे या चित्रपटाचे नाव आहे. विशेष म्हणजे २७ वर्षांपूर्वी 'सत्या' सारखा चित्रपट देणारे राम गोपाल वर्मा आणि मनोज बाजपेयी पुन्हा एकदा या चित्रपटानिमित्त एकत्र दिसणार आहेत. या चित्रपटात मनोज यांच्यासोबत जेनिलिया डिसूजा देखील दिसणार आहे. चित्रपटाचे शूटिंग सुरू झाले असून पहिले शेड्यूल पूर्ण झाले आहे. या चित्रपटाची कथा काहीशी वेगळी आहे. जेव्हा आपण घाबरतो तेव्हा पोलिस स्टेशनकडे जातो, पण जेव्हा पोलिसच घाबरतात तेव्हा ते कुठे जातील? हाच या चित्रपटाचा ट्विस्ट आहे. राम गोपाल वर्मा म्हणाले, मनोजसोबत पुन्हा





काम करणे माझ्यासाठी खूप खास आहे. भीती तेव्हा सर्वात भयानक होते जेव्हा ती सुरक्षेच्या प्रतीकाला आव्हान देते. मनोजची अभिनयशैली आणि जेनेलियाची निरागसता या कथेला आणखी प्रभावी बनवेल. मनोज बाजपेयीने राम गोपाल वर्मा दिग्दर्शित तीन चित्रपटांत काम केले आहे. 'सत्या' व्यतिरिक्त कौन आणि 'सरकार ३' यांचा समावेश होतो. मनोज बाजपेयी अलिकडेच 'इन्स्पेक्टर झेंडे' या चित्रपटात दिसले होते.

आता 'पुलिस स्टेशन में भूत' या चित्रपटात ते दिसणार आहे. मात्र, या चित्रपटाच्या प्रदर्शनाबाबत अद्याप कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. परंतु यावर्षाच्या अखेरीस किंवा पुढील वर्षाच्या सुरुवातीला हा चित्रपट चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होण्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

# मृणालने आता उडवली अनुष्काची खिल्ली







बॉलीवुड अभिनेत्री मृणाल ठाकूर पुन्हा एकदा एका जुन्या व्हिडीओमुळे चर्चेत आली आहे. काही काळापूर्वी बिपाशा बासूबद्दलचा तिचा एक व्हिडीओ व्हायरल झाला होता. त्यामध्ये ती बिपाशाची खिल्ली उडवताना दिसली होती. त्यामुळे मृणालला खूप ट्रोलिंगचा सामना करावा लागला. त्यानंतर अभिनेत्रीने माफीही मागितली. आता मृणालचा आणखी एक व्हिडीओ समोर आला आहे. या व्हिडीओमध्ये ती एका प्रसिद्ध अभिनेत्रीची खिल्ली उडवताना दिसत आहे. मुलाखतीत मृणालला विचारण्यात आले की, एका सुपरस्टार अभिनेत्रीमुळे तिचा कोणताही प्रोजेक्ट गमवावा लागला आहे का? मृणाल ठाकूरचा हा व्हिडीओ रेडिटवर अपलोड करण्यात आला आहे. यावर मृणाल म्हणाली की, जर तिने काही म्हटले, तर तिला ट्रोल केले जाईल. पण नंतर ती म्हणाली, अनेकदा मी स्वतः नकार दिला. कारण- मी तयार नव्हते. नंतर मला जाणवलं की, जर मी त्यावेळी तो चित्रपट केला असता, तर मी स्वतःला गमावलं असतं. तो चित्रपट सुपर हिट झाला आणि त्याचा फायदा त्या अभिनेत्रीला झाला. आता ती अभिनेत्री काम करत नाहीये; पण मी काम करत आहे. मला झटपट प्रसिद्धी नको आहे. कारण जे काही झटपट येते, ते निघूनही जाते. आता सोशल मीडियावर चर्चा सुरू आहे की, मृणालने कोणावर कमेंट केली. लोक म्हणत आहेत की, मृणालने कोणाचेही नाव घेतले नसले तरी तिची कमेंट अनुष्का शर्मावर आहे. कदाचित मृणाल ज्या चित्रपटाबद्दल बोलत आहे तो 'सुलतान' असेल, ज्यामध्ये अनुष्काने सलमान खानच्या पत्नीची भूमिका साकारली होती. खरं तर, जेव्हा मृणाल तिच्या 'जर्सी' चित्रपटाच्या प्रमोशनसाठी 'बिग बॉस १५'मध्ये आली होती, तेव्हा सलमानने स्वतः सांगितले होते की, मृणालला पहिल्यांदा 'सुलतान'साठी घेतले जाणार होते. सलमानने असेही म्हटले होते की, त्यावेळी मृणालची शरीरयष्टी पैलवानासारखी नव्हती. हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर मृणाल ट्रोल होत आहे. ती आज काम करत नाहीये; पण मी करत आहे. स्वतःबद्दल चांगले वाटण्यासाठी इतरांना कमी लेखणाऱ्या महिलांचा मी खरोखर आदर करू शकत नाही. जर हे अनुष्काबद्दल बोलत असेल तर मृणाल खरोखरच मूर्ख आहे. सलमान आणि अनुष्काची केमिस्ट्री चांगली होती. मृणालने चित्रपट केला नाही हे चांगले झाले. अशा कमेंट्स नेटकऱ्यांनी केल्या आहेत. काही दिवसांपूर्वी मृणालची एक जुनी मुलाखत व्हायरल झाली होती. त्या मुलाखतीत ती बिपाशा बासूच्या शरीरावर कमेंट करताना दिसली होती. व्हिडीओ बराच जुना होता; पण बिपाशा बासूने कोणाचेही नाव न घेता प्रतिक्रिया दिली होती. त्यानंतर मृणालने माफी मागितली. ती म्हणाली की, ते विधान सुरुवातीच्या काळातील होते. कोणालाही दुखावण्याचा तिचा कोणताही हेतू नव्हता. अलीकडच्या काळात मृणाल वेगाने प्रसिद्धीच्या झोतात आली आहे. तिला अनेक चांगले चित्रपट मिळाले आहेत आणि तिच्या अभिनयाचेही कौतुक झाले आहे.

# 'या' सिनेमात वरुण दिसणार बाहुबली अवतारात



अभिनेता वरुण धवन आणि अभिनेत्री जान्हवी कपूर यांच्या 'सनी संस्कारी की तुलसी कुमारी' या चित्रपटाचा टीझर रिलीज करण्यात आला आहे, ज्यामध्ये विनोद आणि रोमान्सचा एक उत्तम तडका आहे. यात वरुण आणि जान्हवी यांच्यासोबतच सान्या मल्होत्रा आणि रोहित सराफ यांच्याही व्यक्तिरेखांची ओळख करून देण्यात आली आहे. धर्मा प्रॉडक्शनने त्यांच्या अधिकृत इंस्टाग्राम अकाउंटवर टीझर रिलीज केला आणि कॅप्शनमध्ये लिहिले की, चार लोक, दोन मनं तोडणारे, एक लग्न. 'सनी संस्कारी की तुलसी कुमारी' या चित्रपटाचा टीझर रिलीज झाला आहे. तो २ ऑक्टोबर रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होईल.

एक मिनिटांचा हा टीझर वरुण धवनच्या मजेदार शैलीने सुरू होतो, जिथे तो बाहुबली अवतारात दिसतो. वरुण मजेदार पद्धतीने विचारतो, मी बाहुबलीसारखा दिसत आहे ना? त्यानंतर मित्र विनोदी अंदाजात उत्तर देतो की, 'रणवीर सिंह की धोती में प्रभास का पौधा लग रहा है'. यानंतर वरुण स्वतःची ओळख संस्कारी सनी अशी करून देतो. टीझरमध्ये जान्हवी कपूर आणि कथेत ट्विस्ट आणणाऱ्या इतर पात्रांची झलक देखील दाखवण्यात आली आहे. वरुण धवन आणि जान्हवी कपूरची जोडी पडद्यावर दिसते आणि टीझर संपतो. या चित्रपटात कॉमेडी, रोमान्स आणि डान्स यांचा मजेदार संगम पाहायला मिळेल.

धर्मा प्रॉडक्शनच्या बॅनरखाली बनलेल्या 'सनी संस्कारी की तुलसी कुमारी' या चित्रपटात वरुण आणि जान्हवी पुन्हा एकदा स्क्रीन स्पेस शेअर करताना दिसणार आहेत. यापूर्वी दोघांनी २०२३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'बवाल' चित्रपटात एकत्र काम केले होते. जान्हवी कपूर आणि वरुण धवन यांच्याव्यतिरिक्त, अक्षय ओबेरॉय, रोहित सराफ, सान्या मल्होत्रा आणि मनीष पॉल हे देखील शशांक खेतान दिग्दर्शित या चित्रपटात महत्वाच्या भूमिकांमध्ये आहेत. हा सिनेमा २ ऑक्टोबरला प्रदर्शित होणार आहे.